**University Grants Commission**

**Western Regional Office**

**Ganeshkhind, Pune-411 007**

Submission of Final Report and Utilization

Certificate of

# Minor Research Project

In the Faculty of Social Science

(Sociology)

File No.-

No. 23-1308/09 (WRO) 20 August 2009

Amount Sanctioned Rs.1,00,000/-

Project Title

**रेल्वे स्थानकाच्या आश्रयाने राहून जीवन जगणाऱ्या मुलांचे सामाजिक अध्ययन**

By

**Dr. Sanjay R. Gudadhe**

Deptt. of Sociology

Shri Shivaji College,

Morshi Road, Amravati-444603.

13) Summary of Findings :

संशोधन अध्ययनाच्या अनुशंगाने घेण्यात आलेल्या संशोधन प्रकरणानुसार प्राप्त निष्कर्ष पुढील प्रमाणे मांडण्यात आले आहेत.

**प्रकरण:- १**

**वैयक्तीक व कौटुंबिक पार्श्वभूमी**

१) विदर्भातील रेल्वेस्थानकांच्या आश्रयाने राहून जीवन जगणाऱ्या भटकत्या मुलांमध्ये मुलापेक्षा मुलींचे प्रमाण जास्त दिसते.

२) अशा मुलामध्ये हिंदू व त्या खालोखाल मुस्लीम मुलांचे प्रमाण जास्त आहे.

३) अशा मुलांची जातीय-वर्गवारी लक्षात घेता त्यात भटक्या, खुल्या व अनुसुचित जमातीच्या मुलांचे प्रमाण अनुक्रमे जास्त दिसते.

४) अशा मुलांच्या वयाचा विचार केल्यास त्यात १७ ते २० त १४ ते १७ या वयोगटातील मुलांचे प्रमाण जास्त आहे.

५) अशी मुले जास्तीत जास्त निरक्षर असून ती विभक्त कुटूंबातील असण्याचे प्रमाण जास्त दिसून आले.

६) अशा स्थानकांवरील मुलांच्या कुटूंबातील सभासद संख्या जास्तीत जास्त ५-६ एवढी असून त्यांचे कुटूंब झोपडपट्टीत राहण्याचे प्रमाण जास्त आहे.

७) अशा मुलांचे जास्तीत जास्त कुटूंब स्थिर जीवन जगणारे असले तरी भटके जीवन जगणाऱ्या कुटंबातील मुलांचे प्रमाण अशा मुलांमध्ये लक्षणीय दिसून येते.

८) अशा स्थानकांवर राहणाऱ्या मुलांच्या आई-वडीलांचा विचार केल असता आई किंवा वडील यौपकी एक नसणाऱ्या किंवा दोघेही नसणाऱ्या मुलांचे एकंदरीत प्रमाण लक्षणीय दिसून येते.

९) अशा मुलांपैकी ज्या मुलांना आई किंवा वडील नाहीत त्यापैकी जास्तीत जास्त मुलांना सावत्र आई किंवा वडील असण्याचे प्रमाण महत्तम दिसते.

१०) अशा मुलांच्या कुटूंबात आई-वडील किंवा इतर सभासदाचे संबध दुरावल्याचे प्रमाण जास्त आहे.

११) अशा स्थानकांवर राहणारी व कुटूंब असणारी जास्तीत जास्त मुले दररोज आपल्या कुटूंबात जात नाहीत.

१२) कधी-कधी घरी जाणाऱ्या अशा मुलापैकी बहुतांश मुले आपल्या आई,वडील, भावा बहिणीची आठवण आल्यास घरी जातात असे दिसते.

१३) अशा स्थानकांवरील मुलांना त्यांच्या कुटुंबातील सभासद भेटायला येत नाही. यावरून ही मुले आपल्या कुटूंबापासून दुरावल्याचे प्रमाण जास्त आहे.

प्रकरण:-२

**कुटूंबाचा व्यवसाय व मुलांच्या उदरनिर्वाहाचे मार्ग व विचलीत प्रवृत्ती :**

१) अशा स्थानकांच्या आश्रयाने ५ पेक्षा अधिक वर्षापासून राहून जीवन जगणाऱ्या मुलांचे प्रमाण जास्त दिसून येते.

२) प्रामुख्याने सावत्र आई/वडीलांचा त्रास, गरजापूर्ण न होणे व कुटूंबसभासदांचे पालन पोषण ही या मुलांची या स्थानकांच्या आश्रयाने राहण्याची कारणे दिसून येतात.

३) भिक्षा मागणे, कागद वेचणे हे या मुलांच्या कुटूंबाचे व्यवसाय असल्याचे प्रमाण जास्त आहे.

४) अशा मुलांच्या कुटूंबातील सभासदांचा अवैध व्यवसायाशी संबंध असल्याचे प्रमाण बरेच दिसून येते.

५) ज्या मुलांच्या कुटूंबाचा अवैध व्यवसायाशी संबंध आहे. प्रामुख्यांने त्यांचा संबंध दारू, गांजा, चोरी करणे, वेश्या व्यवसाय इत्यादी व्यवसायाशी दिसतो.

६) भिक्षा मागणे, कागद वेचणे यासारख्या मार्गाचा अवलंब करून उदरनिर्वाह करणाऱ्या मुलांचे प्रमाण अशा स्थानकांच्या आश्रयाने राहणाऱ्या मुलांमध्ये जास्त दिसून येते.

७) अशा स्थानकांवर राहणारी मुले उदरनिर्वाहासाठ ज्या मार्गाचा अवलंब करतात त्यामधून ते आपल्या प्राथमिक गरजा पूर्ण करू शकत नाही असे दिसून येते.

८) अशा स्थानकांच्या आश्रयाने राहून उदरनिर्वाह करणाऱ्या मुलांच्या व्यवसायाचे बॉस असुन त्यांच्या उत्पन्नाचा काही भाग त्यांना द्यावा लागतो असे काही प्रमाणात आढळुन आले.

९) अशा स्थानकांच्या आश्रयाने जीवन जगणाऱ्या मुलांच्या गरजापूर्ण न झाल्यास ते अवैधमार्गाचा अवलंब करण्यांचे प्रमाण लक्षणीय दिसून येते. म्हणजे विचलीत वर्तन प्रवृत्तीला अशी मुले सामान्य मुलांपेक्षा लवकर बळी पडू शकतात.

१०) अशा मुलांचा वाईट व्यवसाय करणाऱ्या लोकांसोबत संपर्क येतो असे दिसते.

११) वाईट व्यवसाय करणारे लोक या मुलांना विविध प्रलोभने दाखवून आपल्या व्यवासयात ओढण्याचा प्रयत्न करण्याचे प्रमाण महत्तम दिसते.

१२) वाईट व्यवसाय करणाऱ्या लोकांच्या व्यवसायात अशी मुले ओढले जाण्याचे प्रमाण काही प्रमाणात असल्याचे दिसून येते. यावरून ही मुले वांग मार्गाने लागण्याची शक्यता सामान्य मुलांपेक्षा जास्त राहु शकते.

१३) आपल्या व्यवसायातून पोट भरत नसल्यास इतर कोणता तरी मार्ग पत्करण्याची मानसिकता अशा मुलांमध्ये बनत असल्याचे दिसते.

१४) अशा मुलांमधील मुलीच्या असहत्येचा फायदा घेवून त्यांचे शारीरिक शोषण किंवा इतर फायदा काही वाईट लोक करून घेण्याचे प्रमाणे काही प्रमाणात असल्याचे दिसते.

१५) रोजगाराचे चांगले मार्ग उपलब्ध झाल्यास ते करण्याची तयारी या मुलांमध्ये असण्याचे प्रमाण जास्त आहे.

प्रकरण:- ३

## सामाजिक स्थिती, परस्पर सामाजिक सुरक्षा व लैंगिक प्रश्न:-

१) अशा मुलांना समाजामध्ये मोठ्या प्रमाणात तुच्छतेची वागणूक देण्यात येत असल्याचे आढळून येते.

२) अशा मुलांकडे समाजातील बहुसंख्य लोक उपेक्षपूर्वक बघतात.

३) अशा मुलांच्या समाजाबद्दल तिरस्काराच्या भावना दिसून येतात.

४) समाजाने चांगली वागणुक द्यावी व आमचे प्रश्न लक्षात घ्यावे ही अशा मुलांची समाजाकडून मुख्य अपेक्षा आहे.

५) अशा स्थानकांवरील मुलांमध्ये समुह करून राहण्याची प्रवृत्ती प्रामुख्याने दिसते.

६) अशा स्थानकांच्या आश्रयाने राहणाऱ्या मुलांचे गट असून प्रत्येक गटाचा एक प्रमुख दिसून येतो. तसेच बहुसंख्य मुलांच्या मते अशा गटाचे कार्य त्या नेत्याच्या मताने चालते.

७) अशा मुलांच्या समुहातील मुले परस्परांना वेळोवेळी मदत करतांना दिसतात. म्हणजेच गटांर्तगत सुरक्षा जोपासली जाते असे दिसते.

८) अशा मुलांपैकी बऱ्याच मुलांना सण उत्सवाबद्दल माहिती होत असली तरी त्याबद्दल माहिती नसणाऱ्यांचे प्रमाण लक्षणीय आहे.

९) अध्ययनाशी संबंधीत बरीच मुले सण उत्सव साजरे करीत असले तरी न करनाऱ्यांचे प्रमाण सुध्दा लक्षणीय आहे.

१०) अशा स्थानकावरील बहुसंख्य मुले आपल्या कुटूंबामध्ये सण उत्सव साजरे करीत नाही तर ते त्यांच्यासारख्या मुलांसोबतच साजरे करतात.

११) अध्ययनाशी संबंधीत वयोगटातील बहुसंख्य मुला/मुलीमध्ये लैंगिक भावना निर्माण होतात असे दिसते.

१२) अध्ययनाशी संबंधीत मुले आपल्या लैंगिक गरजा भागविण्यासाठी आपल्यासारख्या मुला/मुलीसोबत लैंगिक संबंध प्रस्थापित करण्याचे प्रमाण जास्त आहे.

१३) अध्ययनाशी संबंधीत मुले आपल्या लैंगिक गरजा भागविण्यासाठी वेश्या व्यवसाय, हस्तमैथून, समसभोग यासारख्या मार्गाचा अवलंब न करण्याचे प्रमाणे जास्त नसले तरी बऱ्याच प्रमाणात आले.

१४) अध्ययनाशी संबंधीत मुलांपैकी ८% मुलांना गंभीर लैंगिक आजार असल्याचे दिसून आले.

प्रकरण:- ४

आरोग्यविषयक व व्यसनाधिनतेचा प्रश्न

१) अशी मुले वर्षातून ३-४ वेळा आजारी पडण्याचे प्रमाण जास्त आहे.

२) आजारी काळात अशा मुलांची सेवा त्यांच्यासारखी मुले करतात म्हणजे आजारपणाच्या काळात पारस्पारीक सुरक्षा विषयक कार्ये त्यांच्यामध्ये पार पाडल्या जाते.

३) या मुलांमध्ये मलेरिया, टायफाईड सर्दीपडसाद, ताप, हगवण यासारखे आजार प्रामुख्याने दिसतात.

४) अशा मुलांमध्ये काही गंभीर आजाराचे प्रमाण लक्षणिय दिसून येते. त्यात दमा, टि.बी., चर्मरोग याचे प्रमाणे जास्त आहे.

५) अशा मुलांच्या उपचाराचा प्रश्न गंभीर असून ते घरगुती उपचार जास्त प्रमाणात घेतात.

६) अशा मुलांपैकी बहुसंख्य मुलांना कोणते तरी व्यसन असून गुटखा-तंबाखू, अमली पदार्थ यासारख्या सर्वच व्यसनांना बळी पडण्याचे प्रमाण सर्वात जास्त आहे.

७) व्यसनग्रस्त मुलांपैकी जास्तीत जास्त मुले आपले व्यसन पूर्ण करण्यासाठी काहीही करण्यासाठी तयार असल्याचे दिसून येते.

प्रकरण:- ५

## शासकीय योजना, समाज व शासनाकडून अपेक्षा

१) अध्ययनाशी संबंधीत अशा मुलांची शासकीय पातळीवरून कोणत्याही प्रकारची सामाजिक, आर्थिक इत्यादी माहिती घेण्यात आली नसल्याचे दिसून आले.

२) अशा मुलांपैकी बहुसंख्य मुलांना पुनर्वसनासाठी रिमांडहोम, सुधारशाळेत ठेवण्यात आल्याचे दिसत नाही.

३) शाळाबाह्य मुलांसाठी असलेल्या शालेय कार्यक्रमाची माहिती अश्या मुलांना नसल्याचे दिसून आले.

४) अशा मुलांपैकी बहुसंख्य मुलांना इतर सामान्य मुलांप्रमाणे शिक्षण घ्यावे वाटते.

५) अशा मुलांपैकी बहुसंख्य मुलांना शासनाने शिक्षण, रोजगार व त्यांच्या कुटुंबात आर्थिक मदत द्यावी असे वाटते.

14) Contribution to Society :

प्रस्तुत संशोधन प्रकल्पाचे महत्व शासन, समाज व नवीन सिध्दांताच्या बांधणीच्या दृष्टिकोनातुन महत्वपुर्ण आहे. विविध वयोगटातील बालकांचा विविध अंगाने आज अभ्यास केला जातो. बालकाच्या मानवी हक्काचा विचार आज भारतात केला जाता आहे. परंतु सामान्य मुलांच्या तुलनेत अलिप्त पडलेली, उपेक्षीत व वंचित जीवन जगणारी ही मुले आहे. त्यामुळे या मुलांचे प्रश्न सामान्य मुलांपेक्षा वेगळे आहे. त्याची कारणे वेगळी आहेत समाज विघातक प्रवृत्तीला ही मुले बळी पडण्याची शक्यता सामान्य मुलांपेक्षा जास्त असु शकते त्यामुळे सशक्त भारताच्या उभारणीसाठी या मुलांना सामान्य मुलांच्या मुख्य प्रवाहात आणणे आवश्यक आहे.

अशा मुलांचा सामाजिक दृष्टिकोणातुन या ठिकाणी अभ्यास करण्यात आला आहे. त्याचा माहितीचा फायदा शासनाला विविध योजना राबविण्यासाठी होवू शकतो त्यामधील हा एक प्रयत्न आहे.

15) Whether any Ph.D. Enrolled / Produced out of the Project : No

16) No of the publications out of the Project :- NIL

(प्रस्तुत संशोधन प्रकल्पाच्या आधारावर पुस्तक प्रकाशित करण्यात येत आहे.)

**Principal Investigator** **Principal**